पाटपन्हाळे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

जिमखाना विभाग- वार्षिक अहवाल

(२०१७-१८)

---

- **आंतर -महाविद्यालयीन क्रॉस कंट्री, (बिर्ला महाविद्यालय,कल्याण)** :

  २९ ऑगस्ट २०१७ रोजी बिर्ला महाविद्यालय, कल्याण येथे संपन्न झालेल्या आंतर - महाविद्यालयीन क्रॉस -कंट्री स्पर्धेत मुले व मुलींचा संघ सहभागी झाला होता. मुलींच्या संघाने सांघिक गटात तृतीय क्रमांक पटकावला. ६ मुलींना प्रत्येकी कास्य पदक, प्रमाणपत्र, १० मार्क व महाविद्यालयासाठी चषक असे पुरस्काराचे स्वरूप आहे. कु. टेरवकर राणी रामचंद्र, मोहित अस्मिता चंद्रकांत, रामाणे स्वप्नाली सोनू, टेरवकर ज्योती पांडूरंग, महाडीक शितल शशिकांत, विचारे अक्षता दत्ताराम या कास्य पदकाच्या मानकरी ठरल्या.

- **आंतर -महाविद्यालयीन कबड्डी स्पर्धेत सहभाग-**

  १८-०९-२०१७ रोजी डि.बी.जे महाविदयालय येथे संपन्न झालेल्या आंतर - महाविद्यालयीन कबड्डी स्पर्धेत मुलांच्या संघ सहभागी झाला होता.

- **वार्षिक क्रिडा स्पर्धा** :

  दि. ०९ ते ११ जानेवारी २०१८ मध्ये महाविद्यालयाच्या वार्षिक क्रिडा स्पर्धा विद्यार्थ्यांच्या उत्स्फुर्त प्रतिसादामुळे उत्साहाने घेण्यात आल्या. कबड्डी, खो-खो, क्रिकेट या सांघिक स्पर्धांमध्ये सर्वच वर्गांनी सहभाग नोंदविला. धावणे, कॅरम, थाळीफेक, गोळाफेक या वैयक्तिक स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. सर्व सांघिक स्पर्धांमध्ये प्रत्येक वर्गातील मुलींनी सहभाग नोंदविला.

- **पाटपन्हाळे मॅरेथॉन स्पर्धेत यश** :

  दि. १४ जानेवारी २०१८ रोजी पाटपन्हाळे एज्यूकेशन सोसायटीने आयोजित जिल्हास्तरीय मॅरेथॉन स्पर्धेत महाविदयालयाच्या ३३० विदयार्थोनी सहभाग नोंदविला. त्यामध्ये खुला गट (पुरुष) मध्ये कु. अंकित अनंत म्हादलेकर याने चौथा क्रमांक मिळवला.

२०१७-१८ या वर्षात आंतर-महाविद्यालयीन स्तरावर ०६ पदके मिळवून महाविद्यालयाच्या नावलौकीकात मोलाची भर घातली.

जिमखाना विभाग प्रमुख

प्रा खोत एस एस